Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक १८२ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

ते आले, त्यांनी पाहिले अन् निघून गेले..!
(पान २ वर)



Selected

‘उद्या संपूर्ण भारत सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढणार’

मुंबई । मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून देशातील राजकीय वातावरण तापले आहे. दिल्ली आणि मुंबईत आंदोलकांवर होणाऱ्या पोलिसी कारवाईवरून देशभर संतापाचे वातावरण आहे. अश्यातच आता इंडिया आघाडीने आंदोलनाची पुढील दिशा जाहीर केली आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उद्या सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढण्याचे आवाहन केले आहे. या मोर्चानंतर सरन्यायाधीशांना निवेदन सादर करून मतदार यादीतील कथित अनियमितता, मतचोरीचा आरोप आणि विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण अर्थात SIR प्रक्रियेबाबत विरोधकांची भूमिका मांडली जाणार आहे. आपल्या सोशल मीडिया पोस्टमधून त्यांनी हि माहिती दिली,राहुल गांधी यांनी सोशल मीडिया पोस्ट आणि व्हिडिओच्या माध्यमातून आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली.

एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर!

पुण्यातील एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित!

रोहित पवार यांच्या नेतृत्वाखालील आंदोलन स्थगित, ७० हजार पदे भरण्याचे सरकारचे आश्वासन!

जन सम्राट टाईम्स

पुणे | महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) पेपरफुटी प्रकरणावरून गेल्या दहा दिवसांपासून पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला अखेर तात्पुरता विराम मिळाला आहे. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनादरम्यान राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली.

पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती स्थापन करण्यासह आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, चौकशी पूर्ण होईपर्यंत एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी रजेवर जाण्याचा निर्णय जाहीर केला. या घडामोडींनंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करण्याची घोषणा केली. पुण्यातील एस. एम. जोशी पुलाजवळ एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू होते. आंदोलनाची तीव्रता आणि विद्यार्थ्यांचा वाढता दबाव लक्षात घेऊन राज्य सरकारच्या वतीने मंत्री शिवेंद्रराजे भोसले चर्चेसाठी पुढे आले. त्यांनी आमदार रोहित पवार आणि आमदार विश्वजीत कदम यांच्याशी चर्चा करून शासनाचा



निर्णय व मागण्यांबाबतचा मसुदा सादर केला. मात्र, सरकारने काही मागण्या मान्य केल्यानंतरही विद्यार्थी आंदोलन मागे घेण्यास तयार नव्हते. एमपीएससी अध्यक्षांनी चौकशी पूर्ण होईपर्यंत पदापासून दूर राहावे, अशी त्यांची प्रमुख मागणी होती. यावरून आंदोलनस्थळी बराच वेळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी रोहित पवार यांनाही आपली भूमिका पटवून देण्यासाठी बराच वेळ घेतला. अखेर अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी रजेवर जाण्याबाबत समाजमाध्यमावर संदेश प्रसिद्ध केल्यानंतर आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय जाहीर झाला. एमपीएससी पेपरफुटी प्रकरण आणि आयोगातील सुधारणांचा अभ्यास करण्यासाठी दोन महिन्यांच्या कालावधीची चौकशी समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती सरकारच्या मसुद्यात देण्यात आली आहे. या समितीत प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे, बी. डी. नाईक आणि गणेश पाटील, पोलीस अधिकारी लखमी गौतम तसेच उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश दिलीप भोसले यांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. तुकाराम मुंढे यांच्याकडे समितीच्या सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. पेपरफुटी झालेल्या सर्व परीक्षांची चौकशी करण्याची मागणीही मान्य करण्यात आली आहे. त्यामुळे केवळ एका परीक्षेपुरती चौकशी मर्यादित न राहता संबंधित प्रकरणांची व्याप्ती तपासली जाणार असल्याचे सरकारच्या मसुद्यात नमूद आहे. एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी समाजमाध्यमावर संदेश प्रसिद्ध करत चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर जाण्याचा निर्णय जाहीर केला. त्यांनी आपल्या संदेशात नैतिकतेला आयुष्यभर प्राधान्य दिल्याचे नमूद करत आयोगाची स्वायत्तता, विश्वासार्हता आणि विद्यार्थीहित यांना यापुढेही प्राधान्य राहील, अशी भूमिका मांडली. अध्यक्षांच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील प्रमुख मागणीला प्रतिसाद मिळाल्याचे

तीन वर्षांत ७० हजार पदे भरण्याचे आश्वासन

सरकारने विद्यार्थ्यांसाठी आणखी काही महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. पुढील तीन वर्षांत राज्यातील ७० हजार रिक्त पदे भरण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. तसेच, २०२७ मध्ये होणाऱ्या गट-क परीक्षेतील पदांची संख्या दुप्पट करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मसुद्यात नमूद आहे. सत्याग्रह आंदोलनादरम्यान आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याबाबतही सकारात्मक निर्णय जाहीर करण्यात आला आहे. सरकारच्या आश्वासनांनंतर आंदोलन स्थगित झाले असले, तरी या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, चौकशीची निष्पक्षता आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता हेच आता महत्त्वाचे मुद्दे ठरणार आहेत.

मुंबईत CJP आंदोलनावरून राडा! आदित्य-तेजस ठाकरे आंदोलनात उतरले

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: दिल्लीतील आंदोलनाचे पडसाद आता मुंबईतही उमटू लागले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीचे देशव्यापी आंदोलन पार पडत आहे. काल (10 ऑक्टोबर) दिल्ली पोलिसांनी CJP च्या पदाधिकाऱ्यांची तसेच आंदोलनकर्त्यांची धरपकड केल्याने देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबईतदेखील आंदोलनकर्त्यांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले. यावरूनच आता राजकीय वातावरण खवळले आहे. (CJP Protest Mumbai) दादर येथील शिवाजी पार्क परिसरात आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी आंदोलकांची धरपकड सुरू केली. अनेकांना ताब्यात घेण्यात आल्यानंतर शिवसेना भवन परिसरात तणाव निर्माण झाला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे आंदोलनात सहभागी झाले. यावेळी आदित्य ठाकरे आणि पोलिसांमध्ये बाचाबाची झाल्याचे वृत्त आहे. पोलिसांच्या कारवाईवर संताप व्यक्त करत आदित्य ठाकरेंनी सरकारवर टीका केली आणि मुंबई बंद करण्याचा इशारा दिला.CJP च्या आंदोलनासाठी शिवाजी पार्क परिसरात कार्यकर्ते जमू लागल्यानंतर पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला. आंदोलनस्थळाकडे जाणारे मार्ग बंद करण्यात आले आणि अनेकांना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे शिवसेना (ठाकरे गट) कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाली.यानंतर शिवसेना भवन परिसरात कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली. आदित्य ठाकरे



आणि तेजस ठाकरे घटनास्थळी दाखल झाले. आंदोलकांना घेऊन जाणाऱ्या पोलिसांच्या वाहनाला आदित्य ठाकरेंनी रोखल आहे. ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांना सोडण्याची मागणी करत त्यांनी पोलिसांच्या कारवाईचा निषेध केला.पोलिसांच्या कारवाईवरून आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर टीका केली. आंदोलन शांततेत सुरू असताना जाणीवपूर्वक वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला. “आता महाराष्ट्र बंद होणार,” असे म्हणत आदित्य ठाकरेंनी आक्रमक भूमिका घेतली. पोलिसांच्या कारवाईमुळे मुंबई बंद करण्याची वेळ येईल, असा इशाराही त्यांनी दिला. तसेच, “आता आम्ही शांत बसणार नाही,” असे म्हणत त्यांनी आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. पोलिसांनी शिवसेना भवनात प्रवेश केल्याचा आरोपही आदित्य ठाकरेंनी केला. केंद्र सरकारला लाज वाटली पाहिजे, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, अमित ठाकरेंनाही अटक करण्यात आल्याचे आदित्य ठाकरे यांनी सांगितलं. मुंबईतील पोलिसांची कारवाई आणि त्यानंतर शिवसेना भवन परिसरात निर्माण झालेल्या तणावामुळे या आंदोलनाला राजकीय वळण मिळाले आहे. आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे यांच्या सहभागामुळे आंदोलनाची चर्चा अधिक तीव्र झाली आहे. दिल्लीतील आंदोलनाचे पडसाद आता मुंबईतही उमटू लागले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीचे देशव्यापी आंदोलन पार पडत आहे. काल (10 ऑक्टोबर) दिल्ली पोलिसांनी CJP च्या पदाधिकाऱ्यांची तसेच आंदोलनकर्त्यांची धरपकड केल्याने देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर, मुंबईतदेखील आंदोलनकर्त्यांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले. यावरूनच आता राजकीय वातावरण खवळले आहे. (CJP Protest Mumbai) दादर येथील शिवाजी पार्क परिसरात आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी आंदोलकांची धरपकड सुरू केली. अनेकांना ताब्यात घेण्यात आल्यानंतर शिवसेना भवन परिसरात तणाव निर्माण झाला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे आंदोलनात सहभागी झाले.

शेवटच्या ओव्हरमध्ये भारताचा रोमांचक विजय

जन सम्राट टाईम्स

मालेगाव । प्रतिनिधी: भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यात टी20 सीरिजचा तिसरा सामना पार पडला. या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजला 14 धावांनी पराभूत करून 5 सामन्यांच्या सीरिजमध्ये 2-1 ने आघाडी घेतली. भारताच्या 223 धावांच्या प्रतिउत्तरात वेस्टइंडीजच्या संघाने 7 विकेट गमावून केवळ 209 धावांच पोहोचला. सीरिजमधील चौथा टी20 सामना हा 14 ऑक्टोबर रोजी हैदराबाद येथे खेळवला जाईल.

भारताकडून वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंहने सर्वाधिक 3 विकेट घेतल्या. नमन धीरने वेस्ट इंडिजच्या 2 तर अक्षर पटेल आणि नितीश रेड्डी प्रत्येकी एक एक विकेट घेतली. इंदोरच्या होळकर स्टेडियमवर भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यात आयोजित करण्यात आलेल्या सामन्याचा टॉस वेस्ट इंडीजने जिंकला. यावेळी त्यांनी प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि भारतीय संघाला प्रथम फलंदाजीचं आव्हान दिलं. टीम इंडियाने 223 धावा केल्या आणि विजयासाठी वेस्ट इंडीजला 224 धावांचं आव्हान दिलं होतं. भारतीय संघाकडून अभिषेक शर्माने 69 धावांची कामगिरी केली. तर ईशान किशनने 37, तिलक वर्माने 28, अक्षर पटेलने 20 धावांची कामगिरी केली. वेस्ट इंडिजकडून गोलंदाज रोस्टन चेस,



शमार जोसेफ आणि शमार स्प्रिंगरने प्रत्येकी २ विकेट घेतल्या. कीमो पॉल आणि गुडाकेश मोतीने प्रत्येकी 1 विकेट घेतली.

वेस्ट इंडिजला विजयासाठी 224 धावांचं आव्हान मिळाल्यावर वेस्टइंडीजकडून कर्णधार शाई होप आणि कामिल पूरन हे दोघे सलामी फलंदाजीसाठी आले. मात्र वेस्ट इंडिजच्या फलंदाजीची सुरुवात खराब झाली. मागील दोन सामन्यात आपल्या फलंदाजीने जबरदस्त कामगिरी करणारा शाई होप अवघ्या 5 धावा करून बाद झाला. अर्शदीप सिंहने त्याला क्लीन बोल्ड केले. त्यानंतर शिमरॉन हेटमायरने काही उत्कृष्ट फटके मारले आणि 26 बॉलमध्ये 43 धावा केल्या; नमन धीरने त्याला बाद केले. रोव्हमन पॉवेलला विशेष प्रभाव पाडता आला नाही. त्याने सात बॉल पाच धावा केल्या आणि बाद झाला. सॅमसन 21 धावांवर बाद झाला, तर अर्शदीप सिंगने कीमो पॉलला 10 धावांवर माघारी धाडले. 169 धावांपर्यंत वेस्ट इंडीजने सहा विकेट्स गमावल्या होत्या. अर्शदीपने रदरफोर्डला 'क्लीन बोल्ड' करून आपली तिसरी विकेट घेतली. शेरफेन रदरफोर्ड 20 बॉलमध्ये 32 धावा करून बाद झाला. शामार स्प्रिंगर 11 बॉलमध्ये 35 धावांवर नाबाद राहिला, तर रोस्टन चेस 5 धावांवर नाबाद राहिला. भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यात टी20 सीरिजचा तिसरा सामना पार पडला. या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजला 14 धावांनी पराभूत करून 5 सामन्यांच्या सीरिजमध्ये 2-1 ने आघाडी घेतली.

समुद्रात लक्झरीचा नवा अध्याय!

मुंबई : भारतीय क्रूझ पर्यटनाला नवी झळाळी देण्यासाठी 'कॉर्डेलिया क्रूझ' सज्ज झाली आहे. कंपनीच्या नव्या ‘कॉर्डेलिया स्काय’ या आलिशान क्रूझचे मुंबईत 1,500 ड्रोनच्या नेत्रदीपक शोसह स्वागत करण्यात आले. या नव्या जहाजामुळे कंपनीच्या ताफ्यात आता दोन क्रूझचा समावेश झाला असून, मुंबई आणि कोची या दोन ठिकाणांहून प्रवाशांना समुद्रसफरीचा आनंद घेता येणार आहे. विशेष म्हणजे, कंपनीने 2027 मध्ये तिसरे जहाज आणण्याची घोषणाही केली आहे.

भारतीय शेअर बाजारात मोठी खळबळ!

जन सम्राट टाईम्स



ठाणे | प्रतिनिधी: जागतिक आर्थिक घडामोडींचा मोठा परिणाम भारतीय शेअर बाजारावर होताना दिसत आहे. भारतीय शेअर बाजारात सातत्याने मोठी घसरण होत आहे. भारतीय शेअर बाजारात प्रचंड अस्थिरता निर्माण झाली आहे. यामुळे परदेशी गुंतवणूकदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. परदेशी गुंतवणूकदारांनी 44166 कोटी काढून घेतले आहेत. गुंतवणूकदारांनी ऑक्टोबरमध्ये बाजारातून आधीच मोठी रक्कम काढून घेतली आहे. ताज्या आकडेवारीनुसार, 2026 मध्ये एफपीआयचा बहिर्वाह 3 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. डिपॉझिटरीच्या आकडेवारीनुसार, परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी ऑक्टोबरमध्ये भारतीय इक्विटीमधून 44,166 कोटी रुपये काढून घेतले आहेत. PTI ने याबाबतचे वृत्त दिले आहे. विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदार (FPIs) दीर्घ कालावधीनंतर जुलै आणि ऑगस्टमध्ये भारतीय बाजारात परतले.NSDL च्या आकडेवारीनुसार, FPIs ने जुलैमध्ये भारतीय इक्विटीमध्ये ₹20,200 कोटी गुंतवले. ऑगस्टमध्ये ₹29,631 कोटींची गुंतवणूक झाली. सप्टेंबरमध्ये पैसे काढण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली. ऑक्टोबरमध्येही ती वाढत असल्याचे दिसते. आकडेवारीनुसार, अलीकडील विक्रीमुळे, 2026 मध्ये भारतीय इक्विटीमधून एफपीआयचा बहिर्वाह 3.04 ट्रिलियन रुपयांवर पोहोचला आहे. जो मागील संपूर्ण वर्षाच्या एकूण बहिर्वाहापेक्षा जास्त आहे. 2025 मध्ये एफपीआयचा बहिर्वाह 1.66 ट्रिलियन रुपये होता. भारतीय शेअर बाजारातून परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणात पैसे काढत काढत आहेत. यामागे आनेक कारणे आहेत.कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किंमती प्रमुख आणि अत्यंत महत्वाचे कारण असल्याचे सांगितले जात आहे. रुपयाच्या तुलनेत अमेरिकन डॉलर अधिक मजबूत झाला आहे. यामुळे देखील गुतंवणूकदार मोठ्या प्रमाणात भारतीय शेअर बाजारातून बाहेर पडत आहेत. अमेरिकन बाँडवरील वाढलेले उत्पन्न हे तिसरे कारण सांगितले जात आहे. याव्यतिरिक्त उत्तर आशियाई बाजारांमधील एआय-प्रणित तेजीमुळे अधिक परदेशी भांडवल आकर्षित करत आहे. जागतिक आर्थिक घडामोडींचा मोठा परिणाम भारतीय शेअर बाजारावर होताना दिसत आहे. भारतीय शेअर बाजारात सातत्याने मोठी घसरण होत आहे. भारतीय शेअर बाजारात प्रचंड अस्थिरता निर्माण झाली आहे. यामुळे परदेशी गुंतवणूकदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. परदेशी गुंतवणूकदारांनी 44166 कोटी काढून घेतले आहेत. गुंतवणूकदारांनी ऑक्टोबरमध्ये बाजारातून आधीच मोठी रक्कम काढून घेतली आहे. 2026 मध्ये एफपीआयचा बहिर्वाह 3 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. डिपॉझिटरीच्या आकडेवारीनुसार, परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी ऑक्टोबरमध्ये भारतीय इक्विटीमधून 44,166 कोटी रुपये काढून घेतले आहेत. PTI ने याबाबतचे वृत्त दिले आहे. विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदार (FPIs) दीर्घ कालावधीनंतर जुलै आणि ऑगस्टमध्ये भारतीय बाजारात परतले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

महासभेत नगरसेवकाच्या कमरेला पिस्तूल; जळगावच्या राजकीय वर्तुळात खळबळ!

शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक संतोष पाटील यांचा व्हिडिओ व्हायरल

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: जळगाव महानगरपालिकेच्या महासभेत नगरसेवक कमरेला पिस्तूल लावून उपस्थित असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक संतोष पाटील यांच्या कमरेला पिस्तूल असल्याचे व्हिडिओत दिसत असल्याचा दावा करण्यात येत आहे. या प्रकारामुळे महापालिकेच्या सभागृहातील सुरक्षा व्यवस्था, शस्त्र नेण्यासंबंधीचे नियम आणि संबंधित नगरसेवकावर होऊ शकणाऱ्या कारवाईबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. महासभेत पिस्तूल नेलेच कसे? महानगरपालिकेची महासभा ही शहराच्या विकासाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्याचे अधिकृत व्यासपीठ आहे. शहरातील नागरी सुविधा, पायाभूत कामे आणि नागरिकांच्या प्रश्नांवर या सभेत चर्चा होते. अशा सभागृहात नगरसेवकाच्या कमरेला पिस्तूल असल्याचे दृश्य समोर आल्याने सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. संबंधित पिस्तूल परवानाधारक असल्याचे सांगितले जात असले, तरी सभागृहात शस्त्र नेण्यासंबंधी कोणते नियम लागू आहेत आणि त्या नियमांचे पालन झाले का, याची स्पष्टता आवश्यक आहे. महापालिकेच्या प्रवेशद्वारावरील तपासणी व्यवस्था, सुरक्षा कर्मचाऱ्यांची भूमिका आणि सभागृहातील सुरक्षिततेच्या



प्रक्रियेबाबतही चर्चा सुरू झाली आहे. आयुक्तांची भूमिका काय? या प्रकरणात संबंधित नगरसेवकाने नियमबाह्य कृती केली आहे का, याची चौकशी महत्त्वाची ठरणार आहे. नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास आवश्यक अहवाल सादर केला जाईल, अशी भूमिका महापालिका आयुक्तांनी मांडल्याचे वृत्तात नमूद आहे. महासभेत शस्त्र नेण्यास परवानगी आहे किंवा नाही, याबाबत निश्चित माहिती नसून नियमांचा अभ्यास करावा लागेल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित नियम, सभागृहाची सुरक्षा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष घटनेची परिस्थिती तपासल्यानंतरच पुढील कारवाईचे स्वरूप स्पष्ट होऊ शकते. काँग्रेसकडून सदस्यत्व रद्द करण्याची मागणी या प्रकरणावर जळगाव काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अविनाश भालेराव यांनी आक्षेप घेत संबंधित नगरसेवकाचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी केली आहे. “जनतेने शहराच्या विकासासाठी निवडून दिले आहे, दहशत माजविण्यासाठी नाही,” अशी भूमिका मांडत महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. काँग्रेसच्या या मागणीमुळे प्रकरणाला राजकीय वळण मिळाले आहे. मात्र, सदस्यत्व रद्द करण्याबाबत कोणती कारवाई शक्य आहे, हे संबंधित कायदेशीर तरतुदी आणि चौकशीतील निष्कर्षांवर अवलंबून राहणार आहे. चौकशी आणि नियमांची स्पष्टता महत्त्वाची या घटनेनंतर संबंधित नगरसेवकाकडे शस्त्राचा वैध परवाना आहे का, महासभेच्या ठिकाणी शस्त्र नेण्यासंबंधीचे नियम काय आहेत आणि सुरक्षा तपासणीत ही बाब कशी लक्षात आली नाही, या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. नियमभंग आढळल्यास संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून कायद्यानुसार कारवाई होऊ शकते. सध्या व्हायरल व्हिडिओ आणि त्यावर व्यक्त होत असलेल्या राजकीय प्रतिक्रियांमुळे प्रकरण चर्चेत आले आहे. मात्र, अंतिम निष्कर्षापूर्वी घटनेची अधिकृत पडताळणी आणि संबंधित यंत्रणांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. महापालिकेच्या सभागृहाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रशासन कोणती पावले उचलते, याकडे आता जळगावकरांचे लक्ष लागले आहे.

ते आले, त्यांनी पाहिले अन् निघून गेले..!

मुख्यमंत्र्यांनी त्र्यंबकेश्वरला दुरूनच जोडले हात ; रहिवाशांच्या प्रश्नांवर मौन

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी : आणि त्र्यंबकेश्वर परिसरातील प्रलंबित प्रश्न, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामांचा वेग आणि बाधित शेतकरी व नागरिकांच्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या त्र्यंबकेश्वर दौऱ्याची चर्चा रंगली होती. मात्र, प्रत्यक्ष भेटीत मुख्यमंत्र्यांनी दर्शनपथाच्या संकल्पचित्रांची पाहणी केली, मंदिराच्या दिशेने दुरूनच हात जोडले आणि काही वेळातच माघारी फिरले. अपेक्षित पाहणी आणि नागरिकांशी संवाद न झाल्याने 'ते आले, त्यांनी पाहिले अन् निघून गेले' अशी चर्चा स्थानिक पातळीवर सुरू झाली आहे. मात्र भेटीचा उल्लेख टाळला मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यानिमित्त त्र्यंबकेश्वरमध्ये दर्शनपथाच्या ठिकाणी दोन सुसज्ज मंडप उभारण्यात आले होते. दर्शनपथाची माहिती देणारे फलकही लावण्यात आले होते. मुख्यमंत्री त्र्यंबकराजाचे दर्शन घेतील, कुशावर्त घाट आणि नव्याने बांधण्यात येणाऱ्या गोदावरी घाटाची पाहणी करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. नगर परिषद प्रशासनानेही त्यादृष्टीने तयारी केली होती. मात्र, दौऱ्याच्या नियोजनात त्र्यंबकेश्वर भेटीचा स्पष्ट उल्लेख नसल्याने संभ्रम निर्माण झाला होता.

अखेर दुपारी चारच्या सुमारास मुख्यमंत्र्यांचा ताफा त्र्यंबकेश्वरमध्ये दाखल झाला. त्यांनी जुन्या पंचायत समिती कार्यालयाच्या आवारातील दर्शनपथाच्या संकल्पचित्रांची पाहणी केली. त्यानंतर समोरील शंकराचार्य मठाच्या जागेवरून त्र्यंबकेश्वर मंदिराच्या दिशेने हात जोडले आणि तेथून माघारी फिरले. परतीच्या मार्गावर गोदावरी घाटाला धावती भेट देण्यात आली. या वेळी पालकमंत्री गिरीश महाजन, नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, नगरसेवक आणि मंदिराचे विश्वस्त उपस्थित होते. शेतकरी,



गाळेधारकांचे प्रश्न अनुत्तरित?

त्र्यंबकेश्वरमध्ये व्यावसायिक गाळे तोडण्यात आल्याने संबंधित व्यावसायिकांमध्ये नाराजी आहे. साधुग्राम आणि अन्य विकासकामांसाठी सुरू असलेली शेतजमिनींच्या अधिग्रहणाची प्रक्रिया, कुशावर्त परिसरातील निवासी घरांवरील तोडफोडीची टांगती तलवार आणि शहरातील नऊ मीटर रस्त्यांच्या अंमलबजावणीचा प्रश्नही चर्चेत आहे. या मुद्द्यांवरून नागरिकांमध्ये असंतोष असल्याने मुख्यमंत्री प्रत्यक्ष नागरिकांना सामोरे जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. बाधित शेतकरी सकाळपासून गोदावरी घाट परिसरात मुख्यमंत्र्यांच्या भेटीच्या प्रतीक्षेत थांबले होते. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या आगमनाच्या वेळी काही शेतकऱ्यांना तेथून दूर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दर्शनपथ परिसरातही नागरिकांना मुख्यमंत्र्यांपर्यंत सहज पोहोचता येणार नाही, याची दक्षता घेण्यात आली होती. तरीही काही शेतकऱ्यांनी आपली निवेदने मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवली. या निवेदनांवर पुढे काय कार्यवाही होते, याकडे बाधितांचे लक्ष लागले आहे. रामकुंड परिसराकडेही मुख्यमंत्र्यांची पाठ

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील विकासकामांना वेग देण्याची गरज व्यक्त होत आहे. रामकुंड परिसरातील काही कामे अद्याप अपूर्ण असल्याचे सांगितले जात असून, रस्त्यांच्या कामांमधील हलगर्जीपणामुळे अपघातांचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. रस्ते कामांशी संबंधित अपघातांत आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाल्याचा दावा वृत्तांतात करण्यात आला आहे. मुख्यमंत्री फडणवीस नाशिक दौऱ्यावर असल्याने ते रामकुंड परिसराची पाहणी करून सिंहस्थ कामांचा आढावा घेतील, अशी अपेक्षा होती. त्यासाठी महापालिका प्रशासनाने दुपारी परिसर मोकळा करून घेतल्याचे सांगण्यात आले. मात्र, मुख्यमंत्री रामकुंड परिसरात गेलेच नाहीत. त्यामुळे सिंहस्थाच्या कामांचा प्रत्यक्ष आढावा आणि अपूर्ण कामांबाबत चर्चा होण्याची अपेक्षा अपूर्ण राहिली. दौऱ्याच्या मर्यादित स्वरूपामुळे चर्चा त्र्यंबकेश्वरमधील विकासकामे, जमीन अधिग्रहण, गाळेधारकांचे प्रश्न आणि घरांवरील संभाव्य कारवाई यांसारख्या विषयांवर स्थानिक नागरिकांना ठोस भूमिका अपेक्षित होती.

संपादकीय

नवरात्रोत्सव : शक्तीची उपासना की स्त्रीशक्तीचा सन्मान?

नवरात्रोत्सव म्हणजे आदिशक्तीची आराधना, भक्तीचा जागर आणि भारतीय संस्कृतीतील स्त्रीशक्तीच्या गौरवाचे प्रतीक! नऊ दिवस दुर्गा, महालक्ष्मी आणि सरस्वतीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी उसळते, घराघरांत घटस्थापना होते, सार्वजनिक मंडळांच्या परिसरात आकर्षक सजावट केली जाते, तर गरबा-दांडियाच्या तालावर उत्सवाचा आनंद द्विगुणित होतो.

सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण होते. मात्र, या श्रद्धेच्या उत्सवात समाजाने स्वतःला एक अस्वस्थ करणारा, पण अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे—देवीची पूजा करणारा समाज प्रत्यक्ष जीवनात स्त्रीचा सन्मान किती करतो? हा प्रश्न केवळ धार्मिक श्रद्धेपुरता मर्यादित नाही. तो आपल्या सामाजिक मानसिकतेचा, संस्कारांचा आणि स्त्री-पुरुष समानतेविषयीच्या भूमिकेचा आरसा आहे. देवीला शक्तीचे सर्वोच्च प्रतीक मानायचे आणि त्याच वेळी स्त्रीच्या स्वातंत्र्यावर बंधने घालायची, तिच्या निर्णयक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायचे, तिच्या सुरक्षिततेची जबाबदारी तिच्यावरच ढकलायची, हा विरोधाभास दूर झाल्याशिवाय नवरात्रोत्सवाच्या खऱ्या अर्थाची पूर्तता होणार नाही. देवीच्या पूजेतून स्त्रीच्या सन्मानापर्यंतचा प्रवास भारतीय संस्कृतीने स्त्रीशक्तीला प्राचीन काळापासून महत्त्वाचे स्थान दिले आहे. दुर्गा म्हणजे अन्यायाविरुद्ध लढण्याचे सामर्थ्य, महालक्ष्मी म्हणजे समृद्धी आणि सरस्वती म्हणजे ज्ञानाचे प्रतीक. या देवतांच्या आराधनेतून सामर्थ्य, विवेक, समृद्धी आणि सदाचाराची शिकवण मिळते. मात्र, या मूल्यांचा स्वीकार केवळ मंदिरातील पूजेपुरता मर्यादित राहिला, तर त्यातून अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडणार नाही. आजची महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाही. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, शेती, प्रशासन, राजकारण, क्रीडा, संरक्षण आणि अंतराळ संशोधन अशा विविध क्षेत्रांत महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत त्यांनी यशाची शिखरे गाठली आहेत. कुटुंबाची जबाबदारी सांभाळतानाच सामाजिक आणि आर्थिक विकासातही त्या महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. तरीही अनेक महिलांना भेदभाव, असुरक्षितता, कौटुंबिक हिंसाचार, हुंडाप्रथा, बालविवाह आणि सामाजिक रूढींचा सामना करावा लागतो. मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव अनेक कुटुंबांत अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. मुलीच्या शिक्षणापेक्षा तिच्या लग्नाची चिंता अधिक केली जाते. महिलांच्या कर्तृत्वाचे कौतुक केले जाते; पण त्यांच्या स्वातंत्र्याचा आणि स्वतंत्र निर्णयांचा स्वीकार करताना समाजातील काही घटकांची मानसिकता बदलताना दिसत नाही. ही परिस्थिती आत्मपरीक्षणाची मागणी करते. कन्यापूजनासोबत मुलींच्या स्वप्नांचाही सन्मान हवा नवरात्रोत्सवात कन्यापूजनाला विशेष महत्त्व दिले जाते. लहान मुलींना देवीचे रूप मानून त्यांची पूजा केली जाते, त्यांना भोजन दिले जाते आणि आशीर्वाद घेतले जातात. ही परंपरा श्रद्धेचा भाग असली, तरी तिच्यामागील व्यापक संदेश समजून घेणे अधिक आवश्यक आहे. ज्या मुलीला नवरात्रात देवी मानले जाते, तिलाच वर्षभर शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षितता आणि स्वतःचे भविष्य निवडण्याचे स्वातंत्र्य मिळते का? तिच्या करिअरविषयीच्या आकांक्षांना कुटुंबाचा पाठिंबा मिळतो का? तिच्या मताला घरात समान महत्त्व दिले जाते का? मुलीने स्वतःच्या पायावर उभे राहण्याची इच्छा व्यक्त केली, तर तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवला जातो का? कन्यापूजनाचा खरा अर्थ मुलीच्या अस्तित्वाचा, व्यक्तिमत्त्वाचा आणि अधिकारांचा स्वीकार करण्यात आहे. मुलीला केवळ कोणाची तरी मुलगी, पत्नी किंवा आई म्हणून नव्हे, तर स्वतंत्र विचारांची, स्वतःची स्वप्ने असलेली आणि निर्णय घेण्याचा अधिकार असलेली व्यक्ती म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे. मुलींच्या शिक्षणात गुंतवणूक करणे, त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या स्वप्नांना बळ देणे, हेच आधुनिक काळातील खरे कन्यापूजन ठरावे. स्त्रीची सुरक्षितता ही समाजाची सामूहिक जबाबदारी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही गंभीर आहे. सार्वजनिक ठिकाणे, शैक्षणिक संस्था, कामाची ठिकाणे आणि काही वेळा घराचे चार भिंतींतील वातावरणही महिलांसाठी असुरक्षित ठरते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

शिवाजी पार्कवर उद्यापासून पुन्हा आंदोलन

जन सम्राट टाईम्स



मुंबई : | प्रतिनिधी : मुंबईतील CJP आंदोलनाला आता नवे वळण मिळाले आहे. आंदोलनादरम्यान पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या (CJP) समर्थक आणि शिवसैनिकांची सुटका झाल्याची घोषणा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली. मुंबई पोलिसांसोबत चर्चा झाल्यानंतर ताब्यात घेतलेल्या सर्वांना सोडण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील आंदोलन सुरूच राहणार असून, उद्यापासून आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, अमित ठाकरे यांनी उद्यापासून शिवाजी पार्कवर तीव्र आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली. शिवाजी पार्क परिसरातील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी अनेक आंदोलकांना ताब्यात घेतले होते. या कारवाईनंतर शिवसेना भवन परिसरात तणाव निर्माण झाला होता. आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे यांनी आंदोलनात सहभागी होत पोलिसांच्या कारवाईवर नाराजी व्यक्त केली होती.आदित्य ठाकरेंनी ताब्यात घेतलेल्या सर्व आंदोलकांची सुटका झाल्याची माहिती दिली. याबाबत पोलिसांसोबत चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले. उद्याच्या आंदोलनाचे ठिकाण आणि वेळ लवकरच जाहीर करण्यात येईल, असे आदित्य ठाकरे यांनी सांगितले. आंदोलनात सहभागी होणाऱ्या सर्वांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचेही ते म्हणाले.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील लढा सुरूच राहणार असल्याचे आदित्य ठाकरेंनी स्पष्ट केले. देशातील नागरिकांवर दडपशाही होत असल्याचा आरोप करत त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. "तानाशाही मुंबईत खपवून घेतली जाणार नाही," अशी भूमिका त्यांनी मांडली. आंदोलन दडपण्याचा प्रयत्न झाल्यास ते आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. मुंबईत दिल्लीसारखी परिस्थिती निर्माण होऊ देणार नसल्याचे त्यांनी म्हटले. केंद्र सरकारकडून आंदोलकांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले जात असल्याचा आरोपही आदित्य ठाकरेंनी केला.आदित्य ठाकरे यांच्या प्रतिक्रियेनंतर अमित ठाकरे यांनीही माध्यमांशी संवाद साधला. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांना सोडवण्यासाठी आपण येथे आल्याचे त्यांनी सांगितले. ताब्यात घेतलेल्या सर्वांची सुटका झाल्याचे नमूद करत अमित ठाकरेंनी उद्यापासून शिवाजी पार्कवर तीव्र आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली. त्यामुळे ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील आंदोलनाचा पुढील टप्पा मुंबईत कसा पार पडतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दुष्काळ जाहीर झाल्यानंतरही कागदपत्रांची पुनरावृत्ती कशासाठी?



महाराष्ट्रातील शेतकरी आज निसर्गाच्या अनिश्चिततेशी, वाढत्या उत्पादन खर्चाशी, पाण्याच्या टंचाईशी आणि शेतीतील आर्थिक संकटाशी सामना करत आहे. पाऊस कमी पडला, पावसाचा खंड पडला, पिकांची वाढ खुंटली किंवा उभ्या पिकांचे नुकसान झाले, की शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर वर्षभराच्या मेहनतीचे आणि खर्चाचे गणित कोलमडते. अशा परिस्थितीत शासनाकडून दुष्काळी उपाययोजनांची घोषणा होते, प्रशासनाकडून विविध प्रक्रिया सुरू होतात; मात्र प्रत्यक्ष मदत मिळविण्याच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांना पुन्हा पुन्हा कागदपत्रे जमा करावी लागली, वेगवेगळ्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागले आणि एकाच माहितीची अनेकदा पडताळणी करून घ्यावी लागली, तर या व्यवस्थेच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

आज शेतकऱ्यांच्या मनात काही महत्त्वाचे प्रश्न आहेत. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर व्यक्तिगत पंचनामे कशासाठी? फार्मर आयडी तयार केला असेल, तर पुन्हा सातबारा व आठ-अ उतारे का मागितले जात आहेत? पिकांची माहिती जीपीएसद्वारे नोंदवली असेल, तर पुन्हा प्रत्यक्ष पाहणी का केली जात आहे? "शासनाच्या अधिकृत डिजिटल यंत्रणेत उपलब्ध आणि पडताळता येणारी माहिती शेतकऱ्यांकडून पुन्हा मागण्याचे कारण काय?" या प्रक्रियांचा उद्देश मदत लवकर पोहोचविणे आहे की शेतकऱ्यांची प्रतीक्षा वाढविणे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रश्नांची उत्तरे शोधताना प्रशासनाची गरज, नुकसानभरपाईचे निकष आणि शेतकऱ्यांना होणारा त्रास या तिन्ही बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

१. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर व्यक्तिगत पंचनामे कशासाठी?

दुष्काळ ही केवळ पावसाच्या कमतरतेची बाब नाही. पर्जन्यमान, पेरणीची स्थिती, पिकांची वाढ, जमिनीतील ओलावा, पाणी उपलब्धता आणि शेतीवरील संभाव्य परिणाम अशा अनेक घटकांवर दुष्काळाची तीव्रता अवलंबून असते. त्यामुळे दुष्काळ जाहीर करण्याची प्रक्रिया आणि प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्यक्ष नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया यांत फरक असू शकतो. दुष्काळी परिस्थिती घोषित झाल्यानंतरही काही योजनांमध्ये प्रत्यक्ष पीकनुकसान, बाधित क्षेत्र, पीकप्रकार किंवा पात्र लाभार्थी निश्चित करण्यासाठी स्वतंत्र पंचनामा अथवा पडताळणी आवश्यक असू शकते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तिगत पंचनामा अनावश्यक आहे, असे सरसकट म्हणता येणार नाही. मात्र, एकाच पिकाची, एकाच क्षेत्राची आणि एकाच नुकसानीची माहिती यापूर्वीच अधिकृत यंत्रणेकडून नोंदवली असेल, तर त्याच कारणासाठी वारंवार पंचनामे करण्याची गरज का पडते, याचे स्पष्टीकरण प्रशासनाने द्यायला हवे. पंचनाम्याचा उद्देश शेतकऱ्याला मदत मिळवून देणे हा असावा; मदत मिळण्याच्या प्रक्रियेत आणखी विलंब निर्माण करणे नव्हे.

२. फार्मर आयडी असताना पुन्हा सातबारा आणि आठ-अ उतारे का?

शासनाच्या विविध कृषी योजनांमध्ये शेतकऱ्याची ओळख, जमीनधारणा, पीकक्षेत्र, बँक खाते आणि लाभासाठीची पात्रता तपासण्याची आवश्यकता असते. फार्मर आयडीमुळे शेतकऱ्याची ओळख आणि संबंधित डिजिटल नोंदी एकत्रित करण्यास मदत होऊ शकते. परंतु फार्मर आयडी तयार झाला म्हणजे सर्व योजनांसाठी आवश्यक असलेली प्रत्येक जमीनविषयक नोंद, अद्ययावत मालकी तपशील आणि पात्रतेची माहिती आपोआप प्रमाणित झाली आहे, असे प्रत्येक वेळी गृहीत धरता येत नाही. काही योजनांमध्ये अद्ययावत सातबारा, आठ-अ उतारा, संयुक्त मालकी, भाडेपट्ट्याने शेती करणारे शेतकरी किंवा जमिनीतील बदल यांची पडताळणी आवश्यक असू शकते. तरीही शेतकऱ्यांचा रास्त प्रश्न असा आहे की, शासनाच्या डिजिटल यंत्रणेत उपलब्ध असलेली माहिती पुन्हा शेतकऱ्यांकडून कागदाच्या स्वरूपात मागण्याची गरज नेमकी काय? जर संबंधित माहिती अधिकृत पोर्टलवर उपलब्ध असेल आणि तिचा वापर करण्याची प्रशासकीय सुविधा असेल, तर ती कार्यालयांनी स्वतः पडताळून घ्यावी. केवळ माहिती दुसऱ्या विभागाला उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्याने प्रत्येक वेळी उतारे काढून आणावेत, अशी परिस्थिती शक्य तितकी टाळली पाहिजे. त्यासाठी कृषी विभाग, महसूल विभाग आणि संबंधित योजनांच्या अंमलबजावणी यंत्रणांमध्ये माहितीची देवाणघेवाण सुलभ करणे आवश्यक आहे. एखादे अतिरिक्त कागदपत्र खरोखरच आवश्यक असल्यास त्यामागील कारण स्पष्ट सांगावे

३. पीकपेरा जीपीएसद्वारे नोंदवला असेल, तर पुन्हा पाहणी का?

आज शेतीच्या नोंदी डिजिटल करण्यासाठी जीपीएस, मोबाइल ॲप, छायाचित्रे आणि डिजिटल पीकपेरा नोंदणी यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. यामुळे पिकांचे क्षेत्र, पिकांचा प्रकार आणि शेताचे स्थान निश्चित करण्यास मदत होते. योग्य पद्धतीने केलेली डिजिटल नोंद ही प्रशासनासाठी महत्त्वाचा आधार ठरू शकते. मात्र, पीकपेरा नोंदणी आणि नुकसानपाहणी या दोन्ही प्रक्रिया नेहमी सारख्याच नसतात. पीकपेरा नोंदीत कोणते पीक लावले आहे, याची माहिती मिळू शकते; परंतु अतिवृष्टी, पावसाचा दीर्घ खंड, रोगराई किंवा अन्य कारणांमुळे पिकाचे किती नुकसान झाले, हे स्वतंत्रपणे तपासावे लागू शकते. त्यामुळे नुकसानभरपाईच्या योजनेनुसार आवश्यक असलेली पडताळणी योग्य ठरू शकते. परंतु आधीच्या नोंदींचा उपयोग न करता प्रत्येक वेळी नव्याने संपूर्ण प्रक्रिया करण्याची वेळ येत असेल, तर त्याचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. डिजिटल नोंदींचा खरा फायदा तेव्हाच होईल, जेव्हा शेतकऱ्यांचा वेळ वाचेल, प्रशासनाचा खर्च कमी होईल आणि मदतीचे वितरण अधिक पारदर्शक व जलद होईल. तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांची गैरसोय वाढविण्यासाठी नव्हे, तर त्यांची धावपळ कमी करण्यासाठी झाला पाहिजे.

४. मित्रांनो, ही फिरवाफिरवी केवळ वेळकाढूपणा आहे का?

शेतकऱ्यांना वारंवार वेगवेगळ्या कार्यालयांत जावे लागणे, एकाच कागदपत्रांच्या प्रती अनेकदा जमा कराव्या लागणे, एका अधिकाऱ्याकडून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे पाठवले जाणे आणि अर्जाची स्थिती समजत नसल्याने प्रतीक्षा करावी लागणे, या अडचणींचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. प्रशासकीय प्रक्रियेमागे पात्रता निश्चित करणे, गैरव्यवहार रोखणे आणि मदतीचा लाभ योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचविणे अशी कारणे असू शकतात. मात्र, या प्रक्रियांची माहिती शेतकऱ्यांना स्पष्टपणे दिली जात नसेल, आवश्यक कागदपत्रांची यादी वारंवार बदलत असेल किंवा पडताळणीला अवाजवी विलंब होत असेल, तर शेतकऱ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास कमी होऊ शकतो. प्रत्येक पुनर्पडताळणीला जाणीवपूर्वक केलेली टाळाटाळ म्हणणे योग्य ठरणार नाही. परंतु प्रक्रियेतील अनावश्यक पुनरावृत्ती आणि विलंब दूर करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. शेतकरी हा शासनाच्या मदतीसाठी याचना करणारा घटक नसून देशाच्या अन्नसुरक्षेचा कणा आहे. त्याच्या कष्टाचा, वेळेचा आणि आर्थिक परिस्थितीचा विचार करून शासकीय यंत्रणेने संवेदनशीलतेने काम केले पाहिजे. दुष्काळावर मात करण्यासाठी केवळ मदतीची घोषणा पुरेशी नाही. पाणी व्यवस्थापन आणि दीर्घकालीन शेती सुधारणा या सर्व स्तरांवर उपाययोजना आवश्यक आहेत.

लेखक:
श्री.विनय अरविंद बोरसे
सेवानिवृत्त नोडल अधिकारी, स्मार्ट प्रकल्प, आत्मा संस्था
श्री.अमृत बाबुराव पवार

3 वाजता आई-वडिलांना फोन लावायला सांगितला

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपीने आंदोलनाची हाक दिली होती. पोलिसांनी अभिजीत दिपकेंसह सौरभ दास, आशुतोष रांका या 3 सीजेपी नेत्यांना अटक केली. 24 तासांनंतर हमीपत्र घेऊन सुटका करण्यात आली. दंडाधिकाऱ्यांसमोर झालेल्या सुनावणीनंतर तिघांचीही सुटका करण्यात आली. अभिजित दिपके यांनी दिल्ली पोलिसांवर अत्यंत खळबळजनक आरोप केले आहेत.दिल्ली पोलिसांना माझ्या गावात राहणाऱ्या भावाला फोन लावून देण्यासाठी सांगितले मला दोन मिनिटे बोलू द्या अशी पोलिसांना विनंती केली. वकिलांशी बोलू द्या पण त्यांच्याशी बोलू दिले नाही.

पहाटे साडेतीन वाजता आई-वडिलांना फोन लावा तुम्हाला अटक झाली असं सांगा असं सांगतात. अगोदरच आजी मरण पावली होती पण कुठेतरी असं सांगून भीती निर्माण करण्याचा प्रयत्न दिल्ली पोलीस करत असल्याचा आरोप अभिजित दिपके यांनी केला.जेव्हा दुपारपासून विनंती करत होतो माझ्या भावाशी बोलू द्या. पण त्यांनी बोलून दिल नाही. मला नंबर पाठ नसल्यामुळे फोन द्या असं विनंती केली. पण दिल्ली पोलिसांनी फोन दिला नाही. बाय लॉ कोणाला अटक करता, तेव्हा वकिलांना वकिलांना फोन लावता येतो. मात्र तोही लावू दिला नाही. लोक रस्त्यावर पुन्हा उतरणार आहे, मी रस्त्यावर उतरणार आहे असं अभिजित दिपके म्हणाले. नरेंद्र मोदी हा तानाशाह माणूस आहे. त्याची तानाशाही संपवावी लागणार आहे. त्यासाठी रस्त्यावर उतरावे लागेल असं म्हणत आदित ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या समर्थनावर भाष्य केले आहे. एका ज्ञानेश कुमारला वाचवण्यासाठी अख्खी दिल्ली बंद करून टाकली रस्ता बंद केले मेट्रो बंद केले रेल्वे बंद केले. मागील 70 - 80 वर्षाच्या इतिहासात प्लेन मधून डायरेक्ट कोणालाच उचलून अटक करण्यात आली नाही. आम्ही आतंकवादी होतो का? आतंकवादी प्रमाणे प्लेन मधून आम्हाला अटक करण्यात आली. तानाशाही संपवावी लागणार आहे. नाहीतर अख्खा देश विकून खाईल.

पोलिसांना सुद्धा विचार करावा लागेल. मुलांना मारण्याचे आदेश मिळणार असेल, लहान लहान मुलींना मारत आहे. मुलींवर हात टाकत आहे. पोलिसांना सुद्धा यावर विचार करावा लागेल. नरेंद्र मोदी आणि शहाच्या सांगण्यावरून कोण्या मुलाचा खून करावा लागेल तर हे खून करणार आहे का? मुलाना रक्तबंबाळ करणार आहे का? मोदींना खुश करण्यासाठी दिल्ली पोलीस हे करणार आहे का? असा सवाल दिल्ली पोलिसांना अभिजित दिपके यांनी विचारला.

वाईत वीर जीवाजी महाले यांच्या 391 व्या जयंतीचा उत्साह

भव्य शोभायात्रा, मर्दानी खेळांनी वेधले लक्ष;शिवकालीन वेशभूषेतील सहभागी हे शोभायात्रेचे आकर्षण ठरले

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी : शौर्य आणि स्वराज्यनिष्ठेचे प्रतीक असलेल्या वीर जीवाजी महाले यांच्या ३९१ व्या जयंतीनिमित्त वाई शहरासह त्यांच्या कोंढवली येथील जन्मभूमीत उत्साहाचे वातावरण होते. जन्मभूमीत ज्योत प्रज्वलन, स्मृतीस्थळाचे पूजन, वाई शहरातून भव्य शोभायात्रा आणि मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके अशा विविध कार्यक्रमांतून त्यांच्या पराक्रमाला अभिवादन करण्यात आले. वीर जीवा महाले नाभिक संघटना, नाभिक समाज वाई आणि हिंदवी स्वराज्य भूषण वीर जीवाजी महाले उत्सव समिती, जन्मभूमी वाई-कोंढवली यांच्या वतीने सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.कोंढवली येथे सकाळी १० वाजता स्मारक समितीचे अध्यक्ष गणपत चोरट यांच्या अध्यक्षतेखाली व उपाध्यक्ष उमेश जाधव यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला सुरुवात झाली. वीर जीवाजी महाले यांच्या जुन्या वाड्याच्या जागेवर पूजन करून ज्योत प्रज्वलित करण्यात आली. ही ज्योत सिद्धेश्वर मंदिरात आणल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, स्मृतीस्थळावरील पादुका व पुतळ्याचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शंकरराव मर्दाने, राजेंद्र



चोरट, मोहिते सर आणि महेश जाधव यांनी जीवाजी महाले यांच्या जन्मभूमी व स्मारकाविषयी मनोगते व्यक्त केली. निनाद तावरे, संपतराव सूर्यवंशी, गायकवाड, अंबादास दळवी, राऊत, अखिल भारतीय जीवासेनेचे सोमनाथ काळे यांच्यासह महाराष्ट्र नाभिक महामंडळ व वीर जीवा महाले नाभिक संघटनेचे पदाधिकारी, समाजबांधव आणि कोंढवली ग्रामस्थ उपस्थित होते. कोंढवलीहून आणलेल्या ज्योतीचे वाई शहरात स्वागत करण्यात आले. त्यानंतर शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. घोड्यांवर स्वार झालेले मावळे, उंट, हलगी पथक, भगवे ध्वज आणि शिवकालीन वेशभूषेतील सहभागी हे शोभायात्रेचे आकर्षण ठरले. रवी सरांच्या मर्दानी खेळांच्या पथकाने चौकाचौकांत सादर केलेल्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी नागरिकांचे लक्ष वेधले. महिला, युवक, बालगोपाळ आणि विविध समाजांतील शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शोभायात्रा वीर जीवा महाले उद्यानात पोहोचल्यानंतर सभेचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून मदत व पुनर्वसन मंत्री तथा वाई-खंडाळा-महाबळेश्वर मतदारसंघाचे आमदार मकरंद पाटील उपस्थित होते. त्यांच्या हस्ते वीर जीवाजी महाले यांच्या वंशज सुमनअक्का बाळासाहेब सपकाळ (महाले) यांचा विशेष सत्कार करण्यात आला.वीर जीवाजी महाले यांचे शौर्य आणि स्वराज्याच्या रक्षणातील योगदान आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मकरंद पाटील यांनी सांगितले. वीर जीवा महाले नाभिक संघटना व नाभिक समाजाच्या समाजोपयोगी उपक्रमांना सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. नगराध्यक्ष अनिल सावंत यांनी जीवाजी महाले यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांची स्वामिनिष्ठा आणि पराक्रमाचा आदर्श तरुणांनी जपावा, असे आवाहन केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य बापूसाहेब शिंदे, विवेक भोसले, स्वप्निल भिलारे, प्रतापगड उत्सव समितीचे अध्यक्ष भिलारे, स्मारक समितीचे अध्यक्ष गणपत चोरट, महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष शंकरराव मर्दाने आणि सातारा जिल्हाध्यक्ष अंबादास दळवी उपस्थित होते.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

पत्रकार वसाहत आणि पत्रकार भवनासाठी प्रयत्न करणार!

आ. किशोर पाटील यांची ग्वाही; राज्य पत्रकार संघाच्या उत्तर महाराष्ट्रस्तरीय अधिवेशनात पत्रकारांच्या प्रश्नांवर चर्चा

जन सम्राट टाईम्स







पाचोरा । प्रतिनिधी: पत्रकारांच्या समस्या आणि मागण्यांची मला जाणीव असून, पत्रकारांसाठी पत्रकार वसाहत आणि तालुकास्तरावर पत्रकार भवन उभारण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आमदार किशोर आप्पा पाटील यांनी दिली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने पाचोरा येथे आयोजित उत्तर महाराष्ट्रस्तरीय अधिवेशनात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. पत्रकारांच्या मागण्यांचे निवेदन आणि अधिकृत पत्रकारांची यादी सादर करावी, त्यानंतर मुख्यमंत्री स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या अधिवेशनात पत्रकारांचे प्रश्न, सामाजिक बांधिलकी आणि दुष्काळी परिस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संघटित लढा उभारण्याची गरज महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्रस्तरीय अधिवेशन शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी पाचोरा येथे आमदार किशोर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, पाचोरा नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सुनीताताई किशोर पाटील, अहिराणी रील स्टार सचिन कुमावत, नगरसेवक प्रवीण ब्राह्मणे, पत्रकार सचिन सोमवंशी यांच्यासह संघटनेचे विविध पदाधिकारी आणि पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संघटनेचे राज्य उपाध्यक्ष किशोर रायसाकडा यांनी संघटनेच्या सामाजिक, विधायक आणि संघटनात्मक कार्याची माहिती दिली. पत्रकारांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविण्यासोबतच समाजातील वंचित घटकांना मदत करणे, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करणे आणि ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करणे, या उपक्रमांवर त्यांनी प्रकाश टाकला. 'लाडका पत्रकार' योजना सुरू करण्याची मागणी प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारांच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ ही पत्रकारांच्या सुख-दुःखात सहभागी होणारी आणि सामाजिक बांधिलकी जपणारी संघटना असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य सरकारने पत्रकार पेन्शन योजना जाहीर केली असली, तरी अनेक पात्र पत्रकारांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याची बाब त्यांनी मांडली. सर्व पात्र पत्रकारांना पेन्शन योजनेचा लाभ मिळावा, यासाठी संघटितपणे लढा उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्य सरकारकडून लाडकी बहीण आणि लाडका भाऊ यांसारख्या योजना राबविल्या जात असताना पत्रकारांसाठीही 'लाडका पत्रकार' योजना सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली. पत्रकारांना हक्काचे निवासस्थान उपलब्ध व्हावे, यासाठी पत्रकार वसाहती उभारण्याकरिता शासकीय जागा उपलब्ध करून द्यावी. तसेच तालुका स्तरावर पत्रकार भवनासाठी जागा देण्यात यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. पत्रकारांनी बातमी लिहिताना कोणाचेही जीवन उद्ध्वस्त होणार नाही, याची काळजी घ्यावी. पत्रकारितेची सामाजिक जबाबदारी ओळखून लेखन करावे, असा कानमंत्रही आरोटे यांनी दिला. पत्रकारांना कुटुंब मानून मागण्यांसाठी पाठपुरावा करणार अध्यक्षीय भाषणात आमदार किशोर पाटील यांनी पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक भूमिका मांडली. "मी पत्रकार संघाला आपला परिवार मानतो. पत्रकारांसाठी काहीतरी ठोस काम करण्याची माझीही प्रामाणिक इच्छा आहे," असे त्यांनी सांगितले.सध्या प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियातील पत्रकारांची संख्या वाढत असून, शासकीय योजनांचा लाभ पात्र व्यक्तींपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकृत पत्रकारांची यादी तयार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. पत्रकारांनी आपल्या मागण्यांचे सविस्तर निवेदन आणि अधिकृत पत्रकारांची यादी सादर करावी. या मागण्यांचा मुख्यमंत्री स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. पत्रकार वसाहत आणि पत्रकार भवनाच्या मागणीबाबतही आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांसाठी अपघात विमा, ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत अशा उपक्रमांचे कौतुक करत त्यांनी संघटनेच्या कार्याचे अभिनंदन केले. अपघातग्रस्त पत्रकारांना आर्थिक मदत; सामाजिक बांधिलकीचे दर्शन अधिवेशनाच्या निमित्ताने संघटनेच्या सामाजिक कार्याचाही गौरव करण्यात आला. प्रदेश उपाध्यक्ष किशोर रायसाकडा यांच्या पत्नी ॲड. कविता रायसाकडा यांनी तीन अपघातग्रस्त पत्रकारांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत केली. अडचणीच्या काळात पत्रकारांच्या पाठीशी उभे राहण्याचा हा उपक्रम माणुसकीचे दर्शन घडविणारा असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, वंचित ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान आणि पत्रकारांसाठी अपघात विम्यासंदर्भातील उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत पदाधिकाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले. अहिराणी रील स्टार सचिन कुमावत यांनी पाचोरा शहरातील पत्रकार कलाकारांवर प्रेम करणारे असल्याचे सांगत संघटनेच्या विधायक उपक्रमांना सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उत्सवावरील खर्च टाळणार राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांसमोरील संकटांचा उल्लेख करत आमदार किशोर पाटील यांनी यंदा शिवसेनेच्या वतीने साजरा होणारा दुर्गोत्सव आणि १ नोव्हेंबर रोजीचा स्वतःचा वाढदिवस साजरा करणार नसल्याची घोषणा केली. उत्सव आणि वाढदिवसावरील खर्च टाळून ती रक्कम शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री निधीत जमा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. अल निनोच्या संभाव्य परिणामांमुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन पाणी बचतीला प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले. मतदारसंघात पाण्याची परिस्थिती चांगली राहावी आणि सर्वांगीण विकासाला चालना मिळावी, यासाठी आवश्यक पावले उचलण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांनीही 'पाणी अडवा, पाणी जिरवा' यांसारख्या जलसंवर्धनाच्या उपाययोजनांवर प्रबोधनात्मक लेखन करून जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले. मान्यवरांची उपस्थिती; पदाधिकाऱ्यांनी घेतले परिश्रम यावेळी पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष समाधान मैराळे, उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष प्रा. विजय गाढे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भुवनेश दुसाने, उपाध्यक्ष राकेश सुतार, पाचोरा तालुकाध्यक्ष गौतम सोनवणे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. ज्येष्ठ पत्रकार अयाज मोहसिन यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रवीण ब्राह्मणे यांनी आभार मानले.

दैनिक जनसम्राट टाइम्सचे मुख्य संपादक मुकुंदजी नन्नवरे यांना 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान



दैनिक जनसम्राट टाइम्स वृत्तपत्राचे मुख्य संपादक मा. मुकुंदजी नन्नवरे यांना आज पाचोरा येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने प्रतिष्ठेच्या 'जीवन गौरव पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. माननीय आमदार किशोरजी पाटील व अन्य मान्यवरांच्या हस्ते मुकुंदजी नन्नवरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा सन्मान प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे दैनिक जनसम्राट टाइम्स परिवारात आनंदाचे वातावरण असून, पत्रकारिता क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मुकुंदजी नन्नवरे यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

क्रिकेट-फुटबॉलवर चालत होता कोटींचा सट्टा!

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: क्रिकेट, फुटबॉल आणि ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली बेकायदेशीर सट्टेबाजी (बेटिंग) चालवून सर्वसामान्यांच्या बँक खात्यांचा अपहार करणाऱ्या एका आंतरराज्य टोळीचा गुन्हे प्रकटीकरण कक्ष-२ने (वसई) पर्दाफाश केला आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील हायव्होल्टेज आशिया कप २०२६ च्या फायनल सामन्यावर ऑनलाईन सट्टा चालवणाऱ्या या रॅकेटच्या मुसक्या थेट गोव्यात आवळण्यात आल्या असून, आतापर्यंत ९ आरोपींना गजाआड करण्यात पोलिसांना मोठे यश आले. लॅपटॉप, आणि डझनभर बँक खात्यांचे साहित्य जप्त केले आहे. नायगाव पूर्व येथील सनटेक हिल वहा-१ या सोसायटीतील एका फ्लॅटमधून ऑनलाईन बेटिंगचा खेळ सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.

नाशिकच्या दीपाली पवार मृत्यू प्रकरणात नवा ट्विस्ट, पोलीस पतीने CDR काढल्याचा दावा, वडिलांच्या आरोपांना बळ

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्यसेविका म्हणून काम करणाऱ्या दीपाली पवार हिच्या मृत्यू प्रकरणात संशयित पती अनिल सोन्याबापू पवार याच्या पोलीस कोठडीत ११ ऑक्टोबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. शुक्रवारी न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान दीपालीच्या मोबाईलचा कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) काढल्याची बाब समोर आल्याने या प्रकरणात नवा ट्विस्ट आला आहे. हा सीडीआर कोणाच्या आदेशावरुन काढण्यात आला, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला आहे. पोलिस पतीच्या छळाला कंटाळून ३७ वर्षीय दीपाली अनिल पवार (महात्मा नगर, नाशिक) हिने विषारी औषध प्राशन करुन जीव दिल्याचा आरोप होत आहे. दीपालीच्या वडिलांनी सातपूर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, पती तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन शारीरिक व मानसिक छळ करत असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर संशयित अनिल पवार याला अटक करण्यात आली आहे. अहिल्यानगर येथील तिच्या नावावरील फ्लॅट भावाच्या नावावर करण्यासाठी दबाव टाकल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या त्रासाला कंटाळून दीपालीने ४ ऑक्टोबर रोजी विषारी औषध प्राशन केल्याची माहिती आहे. उपचारादरम्यान तिची प्राणज्योत मालवल्यानंतर या प्रकरणी पोलिसांकडून पतीला अटक करण्यात आली. सीडीआर काढल्याने संशयाच्या आरोपांना बळ सुनावणीदरम्यान दीपालीच्या कुटुंबीयांच्या वतीने वकील ॲड. मयुर काळे यांनी युक्तिवाद केला. "मोबाईल सीडीआरच्या मुद्द्यामुळे पती चारित्र्यावर संशय घेत असल्याच्या आरोपांना बळ मिळाले आहे. कोठडीच्या कालावधीत आणखी पुरावे एकत्र करुन संशयिताला कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहे" असे ॲड. मयुर काळे यांनी सांगितले. दरम्यान, दीपालीच्या मुलाने चित्रित केलेला आणि छळाचा दावा असलेला एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे, परंतु त्याची सत्यता पडताळणे बाकी आहे. पोलिसांसमोर आता सर्व पुरावे तपासून तपास करण्याचे आव्हान आहे. बारा वर्षांपूर्वी विवाह दीपाली पवारचा विवाह अनिल पवार याच्याशी सन २०१४ मध्ये झाला होता. दीपाली ह्या जातेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात परिचारिका म्हणून काम करत होत्या, तर तिचा पती अनिल पवार हा नाशिक ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात वरिष्ठ लिपीक म्हणून कार्यरत आहे.

नाशिकमधील नऊ कंपन्यांना क्लोजर नोटीस; दूषित पाण्यामुळे MPCBची कारवाई

अंबड औद्योगिक परिसरातील रसायनयुक्त सांडपाण्याचा दत्तनगरला फटका

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी: अंबड औद्योगिक परिसरातून रसायनयुक्त सांडपाणी जमिनीत झिरपल्याने दत्तनगर भागातील बोअरवेल आणि हातपंपांचे पाणी दूषित झाल्याचा प्रकार समोर आल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) कठोर कारवाई सुरू केली आहे. प्रदूषण नियंत्रणाचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या अंबड परिसरातील एकूण नऊ कंपन्यांना 'क्लोजर नोटीस' बजावण्यात आली आहे. यापैकी चार कंपन्यांना यापूर्वीच बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते, तर आणखी पाच कंपन्यांना आता 'क्लोजर डायरेक्शन्स' जारी झाले आहेत. दत्तनगर परिसरात काही दिवसांपासून बोअरवेल आणि हातपंपांद्वारे पिवळसर, दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात होत्या. या पाण्याच्या वापरामुळे नागरिकांना त्वचेचे विकार, खाज, पुरळ तसेच इतर आरोग्यविषयक त्रास जाणवत असल्याचे समोर आले.

स्थानिकांच्या तक्रारीनंतर या प्रश्नाला गांभीर्य प्राप्त झाले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री गिरीश महाजन यांनी दत्तनगर परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली होती. दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संबंधित यंत्रणांना तत्काळ कारवाईचे आदेश दिले.

त्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण



मंडळ 'ॲक्शन मोड'वर आले असून नियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या उद्योगांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. मंडळाने केलेल्या प्राथमिक तपासणीत काही उद्योगांकडून सांडपाणी प्रक्रिया न करता किंवा नियमांचे पालन न करता सोडले जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याच अनुषंगाने संबंधित कंपन्यांना कारखाना बंद करण्याचे थेट आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, दत्तनगर परिसरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने विशेष मोहीम हाती घेतली आहे. महापालिकेकडून बाधित भागात स्वच्छ पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था केली.

जात असून आरोग्य तपासणी शिबिरेही सुरू करण्यात आली आहेत. महापालिकेचे प्राथमिक आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्यतज्ज्ञ नागरिकांची तपासणी करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन करत आहेत.अंबड औद्योगिक परिसरातून रसायनयुक्त सांडपाणी जमिनीत झिरपल्याने दत्तनगर भागातील बोअरवेल आणि हातपंपांचे पाणी दूषित झाल्याचा प्रकार समोर आल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) कठोर कारवाई सुरू केली आहे. प्रदूषण नियंत्रणाचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या अंबड परिसरातील एकूण नऊ कंपन्यांना 'क्लोजर नोटीस' बजावण्यात आली आहे. यापैकी चार कंपन्यांना यापूर्वीच बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते, तर आणखी पाच कंपन्यांना आता 'क्लोजर डायरेक्शन्स' जारी झाले आहेत.

> दूषित पाणी प्रकरणात यापूर्वी चार कंपन्यांना तर शनिवारी (दि. १०) आणखी पाच कंपन्यांना 'क्लोजर नोटीस' बजावली आहे. यापूर्वीदेखील काही कंपन्यांना दूषित पाणी प्रकरणात कारणे दाखवा नोटिस बजावली होती. त्यानुसार पुढील कारवाई सुरू आहे.
> -विद्यासागर किल्लेदार, प्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी

देवीच्या चरणी बळीराजासाठी साकडे

जन सम्राट टाईम्स

नाशिक। प्रतिनिधी: नवरात्रोत्सवाच्या उत्साहात यंदा टेंभी नाक्याच्या देवीसमोर बळीराजासाठी साकडे घालण्यात आले. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांवरील संकट दूर व्हावे, अशी प्रार्थना करतानाच या संकटाच्या काळात राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील; केंद्र सरकारकडूनही भरीव मदत मिळेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. त्याचवेळी नवरात्रोत्सव मंडळांनीही उत्सवातील काही बचत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन त्यांनी केले. टेंभी नाका येथील 'श्री जय अंबे माँ सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळा'च्या आई दुर्गेश्वरीचा आगमन सोहळा आज मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी आई दुर्गेश्वरीची ढोल ताशे, लेझीम, टाळ मृदंग, कोळी नृत्य, गोंधळ नृत्य, आदिवासी तारपा नृत्य आणि इतर पारंपरिक कलाप्रकार सादर करून भव्य मिळवणूक काढण्यात आली. यानंतर देवीचे टेंभी नाका येथील मंडपात विधिवत पूजन करून तिची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. दुष्काळग्रस्त भागात केंद्राचे पथक पाहणी करून गेले असून मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली याबाबतची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली असता त्यांनीही महाराष्ट्रातील दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा केली आहे. केंद्र सरकारही मोठ्या प्रमाणात सहकार्य करेल, असे आश्वासन मोदी यांनी दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. दुष्काळ जाहीर करण्याची मागणी पूर्ण करण्यात आली असून सवलती आणि नुकसानभरपाईसोबतच संकटग्रस्त कुटुंबांना आवश्यक ती मदत दिली जाईल.

पंचनामे नकोत, थेट मदत द्या! संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करा

हेक्टरी ६० हजारांची मदत, संपूर्ण कर्जमाफी आणि पाणी-चाऱ्याचा प्रश्न तातडीने सोडविण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

सोयगाव । प्रतिनिधी: खरीप हंगामातील पिकांचे नुकसान, पावसातील खंड आणि वाढती दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता संपूर्ण महाराष्ट्रात सरसकट दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शिवराम जाधव यांनी केली आहे. पंचनामे, पाहणी आणि कागदपत्रांच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांना अडकविण्याऐवजी तातडीने मदत द्यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. राज्य सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करून विविध सवलती दिल्या असल्या, तरी अनेक भागांतील परिस्थिती गंभीर असल्याचा दावा जाधव यांनी केला आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागांची व्याप्ती लक्षात घेऊन संपूर्ण राज्यासाठी व्यापक मदत पॅकेज जाहीर करावे आणि केंद्र सरकारकडूनही आवश्यक निधी उपलब्ध करून घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांचे नुकसान यंदा जून महिन्यात पावसाने ओढ दिली, जुलैमध्ये तुरळक पाऊस झाला, तर ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाअभावी पिकांवर गंभीर परिणाम झाल्याचे जाधव यांनी नमूद केले. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत शेतकऱ्यांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.सोयाबीन करपले, कापूस सुकला आणि उसाची वाढ खुंटून पीक वाळण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप हंगामासाठी मशागत, बियाणे, खते, औषधे आणि मजुरीवर मोठा खर्च करूनही अपेक्षित उत्पादनाची आशा मावळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी सांगितले. हेक्टरी ६० हजार खर्च; मदतीचे निकष अपुरे असल्याचा दावा शेतकऱ्यांचा हेक्टरी खर्च ५० ते ६० हजार रुपयांपर्यंत जात असताना,



आपत्ती मदतीच्या निकषांनुसार मिळणारी रक्कम नुकसानाच्या तुलनेत अपुरी असल्याचे जाधव यांनी म्हटले आहे. त्यांनी नमूद केलेल्या माहितीनुसार, एनडीआरएफच्या निकषांनुसार हेक्टरी ८,५०० रुपयांच्या मदतीची तरतूद आणि क्षेत्रमर्यादेमुळे शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष नुकसान भरून निघत नाही. त्यामुळे मदतीची रक्कम वाढवून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक दिलासा द्यावा आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांसाठी संपूर्ण कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. दुष्काळ निवारणासाठी पाच प्रमुख मागण्या शिवराम जाधव यांनी शासनासमोर पुढील मागण्या मांडल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करा : दुष्काळाची व्याप्ती आणि तीव्रता लक्षात घेऊन राज्यभरातील बाधित शेतकऱ्यांना मदत द्यावी. पंचनाम्यांच्या प्रक्रियेतून दिलासा द्या : कागदपत्रांच्या विलंबात न अडकवता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत देण्याबाबत निर्णय घ्यावा. भरीव मदत आणि कर्जमाफी द्या : हेक्टरी ६० हजार रुपयांपर्यंत होणारा खर्च लक्षात घेऊन मदत वाढवावी आणि संपूर्ण कर्जमाफीचा विचार करावा. निधी दुष्काळ निवारणाकडे वळवा : शक्तिपीठ महामार्ग आणि कुंभमेळ्यासारख्या मोठ्या प्रकल्पांच्या निधीतील शक्य तरतुदींचा पुनर्विचार करून दुष्काळ निवारणाला प्राधान्य द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. पाणी आणि चाऱ्याची व्यवस्था करा : पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करावी आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. नियमांपेक्षा शेतकऱ्यांचे जगणे महत्त्वाचे! दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे आवश्यक आहे. प्रशासनाने केवळ नियम आणि कागदपत्रांच्या प्रक्रियेला प्राधान्य न देता शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन निर्णय घ्यावेत. पाणीटंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न या संकटांवर एकाच वेळी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे जाधव यांनी म्हटले आहे.अडकता शेतकऱ्याला जगवावे,' असे आवाहन करत त्यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याची मागणी केली आहे. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत शेतकऱ्यांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.सोयाबीन करपले, कापूस सुकला आणि उसाची वाढ खुंटून पीक वाळण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप हंगामासाठी मशागत, बियाणे, खते, औषधे आणि मजुरीवर मोठा खर्च करूनही अपेक्षित उत्पादनाची आशा मावळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी सांगितले.

पावसाअभावी पिकांवर गंभीर परिणाम

हंगामातील पिकांचे नुकसान, पावसातील खंड आणि वाढती दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता संपूर्ण महाराष्ट्रात सरसकट दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शिवराम जाधव यांनी केली आहे. पंचनामे, पाहणी आणि कागदपत्रांच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांना अडकविण्याऐवजी तातडीने मदत द्यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. राज्य सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करून विविध सवलती दिल्या असल्या, तरी अनेक भागांतील परिस्थिती गंभीर असल्याचा दावा जाधव यांनी केला आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागांची व्याप्ती लक्षात घेऊन संपूर्ण राज्यासाठी व्यापक मदत पॅकेज जाहीर करावे आणि केंद्र सरकारकडूनही आवश्यक निधी उपलब्ध करून घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांचे नुकसान यंदा जून महिन्यात पावसाने ओढ दिली, जुलैमध्ये तुरळक पाऊस झाला, तर ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाअभावी पिकांवर गंभीर परिणाम झाल्याचे जाधव यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.सोयाबीन करपले, कापूस सुकला आणि उसाची वाढ खुंटून पीक वाळण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप हंगामासाठी मशागत, बियाणे, खते, औषधे आणि मजुरीवर मोठा खर्च करूनही अपेक्षित उत्पादनाची आशा मावळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी सांगितले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

कुऱ्हा हरदो शाळेत मराठी अभिजात भाषा सप्ताह उत्साहात



जन सम्राट टाईम्स

कुऱ्हा हरदो। प्रतिनिधी : मराठी भाषेचा समृद्ध वारसा, साहित्यपरंपरा आणि लोकसंस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो येथे आयोजित 'मराठी अभिजात भाषा सप्ताहा'ची आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत उत्साहात सांगता झाली. शाळेतील शिक्षिका डॉ. वैशाली संसारे यांच्या संकल्पनेतून ३ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या या सप्ताहात विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांतून मराठी भाषेचे महत्त्व जाणून घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे होते. सुरेश भट यांच्या 'लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी; जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी' या कवितेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर भुलाबाई पूजन करून पारंपरिक लोकसंस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले. ओव्या, अभंग आणि भुलाबाईच्या गीतांतून लोकसंस्कृतीचा जागर सप्ताहादरम्यान जात्यावरील ओव्या, भुलाबाईची पारंपरिक गाणी, अभंग, मराठी साहित्यवाचन आणि समूहगायन असे विविध उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी म्हणी, वाक्प्रचार, कवी, लेखक आणि कथासंग्रह यांची माहिती संकलित केली. तसेच विद्यार्थ्यांच्या भाषिक ज्ञानात भर घालण्यासाठी प्रश्नमंजुषेचेही आयोजन करण्यात आले. जात्यावरील ओव्या आणि भुलाबाईच्या गाण्यांच्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इयत्ता पहिली ते सातवीतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा, समूहगायन आणि लोकपरंपरेतील गीतांच्या सादरीकरणातून भुलाबाई उत्सवाचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले. आनंददायी वातावरणात पारंपरिक लोककला व संस्कृतीचे जतन व्हावे आणि विद्यार्थ्यांना लोकपरंपरेची ओळख व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

अभिजात भाषेचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत मराठी अभिजात भाषा म्हणजे काय, भाषेचा ऐतिहासिक वारसा कोणता आणि भारतातील अभिजात भाषांचे महत्त्व काय, याविषयी डॉ. वैशाली संसारे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सोप्या भाषेत माहिती दिली. भाषेचे संवर्धन, साहित्याचे वाचन आणि पारंपरिक सांस्कृतिक मूल्यांचे जतन यांचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील साहित्यिक समृद्धीबरोबरच लोकजीवनाशी जोडलेल्या परंपरांचा अनुभव घेता आला. पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष सहभागातून भाषा आणि संस्कृतीची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न या सप्ताहातून करण्यात आला.

'अमीर की तिसरी शादी सलमान कुंवारा' वेब सिरीजचा नाशिकमध्ये शुभारंभ!

ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले यांच्या हस्ते विशेष सन्मान

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी खान्देशी मनोरंजनविश्वात उत्सुकता निर्माण केलेल्या 'अमीर की तिसरी शादी सलमान कुंवारा' या वेब सिरीजचा शुभारंभ नाशिक येथील ग्रेप काउंटी इको रिसॉर्ट, त्र्यंबकेश्वर रोड येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाला. खान्देश टॉकीज प्रस्तुत आणि दिव्यश्री प्रोडक्शन निर्मित या वेब सिरीजच्या माध्यमातून नाशिक आणि खान्देशातील कलाकारांना एकत्रित व्यासपीठ मिळाले आहे. या सिरीजमध्ये खान्देशचे अष्टपैलू अभिनेता, निर्माता आणि दिग्दर्शक संजय सोनवणे हे 'छबूशेठ' या महत्त्वपूर्ण विनोदी भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. 'छबूशेठ'च्या भूमिकेत संजय सोनवणे खान्देशच्या कलाविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे संजय सोनवणे यांनी अभिनय, निर्मिती आणि दिग्दर्शन अशा विविध क्षेत्रांत काम केले आहे. 'अमीर की तिसरी शादी सलमान कुंवारा' या वेब सिरीजमध्ये त्यांनी साकारलेली 'छबूशेठ' ही विनोदी भूमिका विशेष आकर्षण ठरण्याची अपेक्षा आहे. त्यांच्या सहभागामुळे सिरीजविषयीची उत्सुकता वाढली असून, खान्देशी कलाकाराच्या या भूमिकेची चर्चा रंगू लागली आहे. या वेब सिरीजच्या शुभारंभप्रसंगी हिंदी-मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या हस्ते अभिनेता संजय सोनवणे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

वेब सिरीजचे निर्माते-दिग्दर्शक गिरीश सोनी, आनंद बच्छाव तसेच मोहसीन मुस्कान आणि अरबाज मुस्कान यांच्या वतीने हा सन्मान करण्यात आला. नाशिक-खान्देशच्या कलाकारांना मोठे व्यासपीठ या वेब सिरीजमध्ये नाशिक आणि खान्देश परिसरातील अनेक नामवंत कलाकार विविध भूमिकांत दिसणार आहेत. स्थानिक कलाकारांच्या अभिनयाला व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या निर्मितीतून करण्यात आला आहे.विनोद, मनोरंजन आणि स्थानिक कलाविश्वातील प्रतिभा यांची सांगड घालणाऱ्या या सिरीजकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे. या वेब सिरीजचे निर्माते-दिग्दर्शक गिरीश सोनी यांनी संजय सोनवणे यांच्या सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, "संजय सोनवणे यांच्यासारखा अनुभवी कलाकार आमच्या टीममध्ये असणे हीच आमच्या वेब सिरीजची ताकद आहे. ही वेब सिरीज प्रेक्षकांच्या भेटीला आली असून, नाशिक-खान्देशच्या कलाकारांना मोठे व्यासपीठ मिळाले आहे." संपूर्ण टीमची उपस्थिती शुभारंभप्रसंगी डीओपी मोहसीन मुस्कान, अरबाज मुस्कान, लेखक नितीन अहिरराव, प्रोडक्शन हेड अजय गवळी, भानुदास पाटील यांच्यासह अक्षता भदाणे, सुनील गोडबोले, विद्या भाटिया, पुष्पा ठाकूर, भटू चौधरी, योगेश निकम, दीपक खंडाळे, मुक्ता माळी, पूनम सैंदाणे, सोनाली वाघमारे, मुकेश देसाई, पूजा देसाई, शाहरूख कुरेशी, ज्योती पारखे, पूनम सपकाळे, पूजा पाटील, निकिता पाटील, मयुरी चव्हाण, चंदन सोनपसारे, गायत्री पाटील, रजनी भामरे, रवींद्र भामरे, यशवंत सोनवणे आणि सरिता सोनवणे यांच्यासह संपूर्ण टीम उपस्थित होती.

पारोळा वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. अकील पिंजारी यांची निवड!

जन सम्राट टाईम्स

पारोळा । (प्रतिनिधी): पारोळा वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. अकील युसूफ पिंजारी यांची सर्वानुमते निवड झाल्याबद्दल पिंजारी मन्सुरी समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करून गौरविण्यात आले. समाजासाठी केलेले कार्य, सामाजिक क्षेत्रातील सक्रिय सहभाग आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांची दखल घेत त्यांना 'समाजभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी पारोळा वकील संघाच्या सर्वसाधारण सभेत ॲड. अकील युसूफ पिंजारी यांची अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडीमुळे त्यांच्या व्यावसायिक वाटचालीत महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. त्यानिमित्त पारोळा तालुका पिंजारी मन्सुरी समाजाच्या वतीने आयोजित सत्कार सोहळ्यात त्यांना सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. सामाजिक कार्याची दखल घेत 'समाजभूषण' पुरस्कार ॲड. अकील युसूफ पिंजारी



यांनी वकिली व्यवसायासोबतच सामाजिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदविला आहे. समाजहितासाठी केलेले कार्य आणि समाजाप्रती असलेली त्यांची बांधिलकी लक्षात घेऊन समाजाच्या वतीने त्यांना 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या निवडीमुळे समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समाजाच्या विश्वासातून कार्याची नवी प्रेरणा या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना ॲड. अकील युसूफ पिंजारी यांनी पिंजारी मन्सुरी समाजाचे आभार मानले. समाजाने दिलेला सन्मान आणि वकील बांधवांनी व्यक्त केलेला विश्वास ही आपल्यासाठी प्रेरणादायी बाब असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. आगामी काळातही समाजाच्या तसेच सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी प्रामाणिकपणे कार्यरत राहण्याचा प्रयत्न करू, असे त्यांनी सांगितले. मान्यवरांकडून अभिनंदन या सत्कार सोहळ्याला पिंजारी मन्सुरी समाजातील ज्येष्ठ नागरिक, पदाधिकारी, समाजबांधव आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी ॲड. अकील युसूफ पिंजारी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. वकील संघाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आणि समाजसेवेचे कार्य यांची सांगड घालत ते पुढील काळातही योगदान देतील, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

क्लासला जाताना काळाचा घाला; ट्रकच्या धडकेत ११वीतील विद्यार्थ्याचा मृत्यू

जन सम्राट टाईम्स

नांदगाव । प्रतिनिधी: खासगी क्लासला जाण्यासाठी दुचाकीने निघालेल्या इयत्ता अकरावीतील विद्यार्थ्याचा ट्रकच्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी सकाळी नांदगाव उड्डाणपुलाजवळ घडली. सार्थक संतोष चव्हाण (वय १७, रा. साकोरा) असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून, त्याचा मित्र सागर कैलास फड (वय १७, रा. तळवाडे) हा या अपघातात गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे साकोरा गावासह नांदगाव तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. उड्डाणपुलाजवळ ट्रकची दुचाकीला जोरदार धडक मिळालेल्या माहितीनुसार, सार्थक चव्हाण हा इयत्ता अकरावीमध्ये शिक्षण घेत होता. शुक्रवारी सकाळी तो मित्र सागर फड याच्यासोबत दुचाकी (क्रमांक एमएच ४१ बीएम ०९६६) वरून साकोरा येथून नांदगावकडे खासगी क्लाससाठी जात होता. दरम्यान, नांदगाव उड्डाणपुलाजवळील वळणावर छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकने (क्रमांक एमएच ५४ बीडीजे ४८१९) त्यांच्या दुचाकीला



जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की सार्थकला गंभीर दुखापत झाली. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला, तर सागर फड गंभीर जखमी झाला. उपचारापूर्वीच सार्थकचा मृत्यू अपघात घडताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली. दोघांनाही तातडीने ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने सार्थकचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे समजते. गंभीर जखमी सागरवर उपचार सुरू असल्याची माहिती आहे. चव्हाण कुटुंबावर दुःखाचा डोंगर सार्थक हा चव्हाण कुटुंबाचा एकुलता एक मुलगा होता. शिक्षण घेऊन भविष्य घडविण्याच्या वयातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेने कुटुंबीयांसह नातेवाईक आणि मित्रपरिवाराला मोठा धक्का बसला असून, साकोरा गावावर शोककळा पसरली आहे. ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल या प्रकरणी दिलेल्या फिर्यादीनुसार, धुळे जिल्ह्यातील आर्वी येथील विलास पवार याच्याविरुद्ध नांदगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे समजते. अपघाताचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. अल्पवयीन विद्यार्थ्याच्या मृत्यूच्या या घटनेमुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. उड्डाणपुलाजवळील वळणांवर वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून वाहतुकीचे नियम पाळण्याची गरज अधोरेखित झाली आहे. अकरावीतील विद्यार्थ्याचा ट्रकच्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी सकाळी नांदगाव उड्डाणपुलाजवळ घडली. सार्थक संतोष चव्हाण असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून, त्याचा मित्र सागर कैलास फड हा या अपघातात गंभीर जखमी झाला आहे.

दापोरा ते पटणादेवी मानाच्या ज्योतीची 34 वर्षांची अखंड परंपरा!

रंगलाल शिवा सोनवणे, अध्यक्ष विशाल सोनवणे, उपाध्यक्ष नाना मोरे यांच्यासह कार्यकर्त्यांचा पुढाकार

जन सम्राट टाईम्स

दापोरा। प्रतिनिधी: श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा अनोखा संगम असलेली दापोरा ते पटणादेवी मानाच्या ज्योतीची परंपरा गेल्या ३४ वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे. नवदुर्गा मित्र मंडळ, दापोरा यांच्या वतीने जपली जाणारी ही धार्मिक परंपरा आजही तित क्याच भक्तिभावाने आणि उत्साहाने पुढे नेली जात आहे. देवीवरील अढळ श्रद्धा, कार्यकर्त्यांची एकजूट आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याची तळमळ या उपक्रमातून अधोरेखित होत आहे. साडेतीन दशकांपासून श्रद्धेचा अखंड प्रवास नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर दापोरा येथील नवदुर्गा मित्र मंडळाच्या वतीने पटणादेवी येथून



मानाची ज्योत आणण्याची परंपरा जपली जाते. गेल्या साडेतीन दशकांपासून सुरू असलेला हा भक्तिमय प्रवास गावाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. वर्षानुवर्षे श्रद्धेने जपली जाणारी ही परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी मंडळाचे कार्यकर्ते सातत्याने प्रयत्न करीत आहेत. भक्तिमय जयघोषाने देवीचा गजर! "संकट समयी देव सर्व, तुला शरण आले, अगाध शक्तीने तूच दुष्ट दैत्य संहारिले!" या भक्तिपर ओळींमधून आदिशक्तीवरील श्रद्धा आणि भक्तांचा अढळ विश्वास व्यक्त होतो. मानाच्या ज्योतीच्या परंपरेमुळे दापोरा गावातील धार्मिक वातावरण भक्तिमय होत असून, देवीच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असते. नवदुर्गा मित्र मंडळाचा परंपरा जपण्याचा संकल्प नवदुर्गा मित्र मंडळाचे मार्गदर्शक रंगलाल शिवा सोनवणे, अध्यक्ष विशाल सोनवणे, उपाध्यक्ष नाना मोरे आणि मंडळाचे सर्व कार्यकर्ते या धार्मिक उपक्रमासाठी योगदान देत आहेत. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांतून ३४ वर्षांची ही परंपरा अखंड सुरू असून, श्रद्धेचा हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्पही जपला जात आहे. श्रद्धा, निष्ठा आणि संस्कृतीचा वारसा दापोरा ते पटणादेवी मानाच्या ज्योतीचा प्रवास हा केवळ धार्मिक उपक्रम नसून गावाच्या श्रद्धेचा, एकतेचा आणि सांस्कृतिक परंपरेचा मानबिंदू आहे. काळ बदलला, पिढ्या बदलल्या; मात्र देवीवरील श्रद्धा आणि मानाच्या ज्योतीची परंपरा कायम राहिली आहे. नवदुर्गा मित्र मंडळाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे दापोरा गावाचा हा धार्मिक वारसा जतन होत असून, ३४ वर्षांपासून तेवत असलेला श्रद्धेचा दीप आजही भक्तिभावाने उजळत आहे.

३४ वर्षांपासून अखंडपणे सुरू

श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा अनोखा संगम असलेली दापोरा ते पटणादेवी मानाच्या ज्योतीची परंपरा गेल्या ३४ वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे. नवदुर्गा मित्र मंडळ, दापोरा यांच्या वतीने जपली जाणारी ही धार्मिक परंपरा आजही तित क्याच भक्तिभावाने आणि उत्साहाने पुढे नेली जात आहे. देवीवरील अढळ श्रद्धा, कार्यकर्त्यांची एकजूट आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याची तळमळ या उपक्रमातून अधोरेखित होत आहे.

मुंबई-आग्रा महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार!

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: मुंबई-आग्रा महामार्गावरील नगाव गावाजवळ रस्ता ओलांडणाऱ्या बिबट्याचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना घडली. रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास ही घटना घडल्याची माहिती आहे. घटनेनंतर महामार्गावर नागरिकांची मोठी गर्दी झाली, तर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने वाहतुकीवरही परिणाम झाला.

घटनास्थळी धाव घेत मृत बिबट्याला ताब्यात घेतले. रस्ता ओलांडताना वाहनाची धडक मुंबई-आग्रा महामार्गावरील नगाव गावाजवळ रात्रीच्या वेळी नर जातीचा बिबट्या रस्ता ओलांडत होता. त्याचवेळी भरधाव अज्ञात वाहनाची त्याला धडक बसली. या धडकेत बिबट्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. धडकेनंतर बिबट्या जखमी अवस्थेत तडफडत असल्याचे दृश्य व्हिडिओमध्ये दिसत असल्याची माहिती आहे. वनविभागाकडून मृत बिबट्या ताब्यात घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून मृत बिबट्याला महामार्गावरून बाजूला केले.वाहनातून त्याला कार्यालयात नेण्यात आले. बिबट्याच्या मृत्यूची माहिती परिसरात पसरताच घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली. महामार्गावर वाहनचालक आणि बघ्यांची गर्दी झाल्याने काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला. वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या महामार्गावर वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून सतर्कतेने प्रवास करण्याची गरज या घटनेमुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे